# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. १८९/२०१२

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २५ (४) नुसार, राज्य माहिती आयोगाने राज्य विधीमंडळासमोर सादर केलेल्या सन २०११ च्या सहाव्या वार्षिक अहवालामधील प्रकरण पाच (५) मध्ये, सार्वजनिक प्राधिकरणाकडून, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता शासनाकडे केलेल्या शिफारशी अधिपत्याखालील सर्व कार्यालये/जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणणेकामी महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे क्रमांक - माअअ २०११/प्र.क्र. ८७-२०११/आस्था २, दिनांक २४/०५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये सूचित करण्यात आले असून सदरहू शिफारशी यासोबत जोडण्यात आलेल्या आहेत. सदर शिफारशी विचारात घेऊन आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. मा. ल. जाधव)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. - मा.अ./९५९२
दिनांक - २४/०८/२०१२

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :-**

१) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
२) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
३) सर्व प्राचार्य/संचालक, पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

महाराष्ट्र शासन

क्रमांक : माअअ २०११/प्र.क्र. ८७-२०११/आस्था २
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २४.५.२०१२

प्रति,

सर्व अकृषिक विद्यापीठांचे कुलगुरु, महाराष्ट्र राज्य,
सर्व संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य,

माहिती अधिकारी कार्यालय
आवक क्रमांक - मा. अ./ 1197
दिनांक - 29/06/2012

**विषय :** माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत सन २०११ चा सहावा वार्षिक अहवाल...

माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २५ (४) नुसार, राज्य माहिती आयोगाने राज्य विधीमंडळासमोर सादर केलेल्या सन २०११ च्या सहाव्या वार्षिक अहवालामधील प्रकरण पाच(५) मध्ये, सार्वजनिक प्राधिकरणाकडून, माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या प्रभावी अंमलबजावणी-करिता शासनाकडे काही शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशींमध्ये विद्यमान वर्षाबरोबरच मागील काही वर्षातील शिफारशींचाही समावेश केलेला आहे. *सदर सर्व शिफारशींची प्रत यासोबत जोडली आहे.* **सर्व कुलगुरु / सर्व संचालक यांनी उक्त सर्व शिफारशी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / जनमाहिती अधिकारी / प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास तात्काळ आणाव्यात** आणि सार्वजनिक प्राधिकरण म्हणून त्यांच्या-त्यांच्या स्तरावरुन त्वरित कार्यवाही करण्यात यावी व त्याचा पूर्तता अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

आपला,

( बा. म. राऊत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

माहिती अधिकारी

UNIVERSITY OF PUNE
(General Section)
25 JUN 2012
Inward No. 533

प्रकरण क्र. ५

## सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास केलेल्या शिफारशी

### राज्य माहिती आयोगाच्या सन २००६ च्या अहवालात शासनास केलेल्या शिफारशी

राज्य माहिती आयुक्तांनी द्वितीय अपीलाची सुनावणी घेत असताना, ज्या बाबी त्यांच्या निदर्शनास आल्या त्यांच्याआधारे राज्य माहिती आयोगाच्या, राज्य विधान मंडळास यापुर्वी सादर केलेल्या विविध वार्षिक अहवालांमध्ये (प्रकरण ५ मध्ये) शासनास शिफारशी केल्या आहेत. तसेच विद्यमान अहवालातही आयोगाने शिफारशी केल्या आहेत. यापूर्वीच्या वार्षिक अहवालातील ठळक शिफारशी खालीलप्रमाणे :-

### राज्य माहिती आयोगाच्या सन २००७ च्या अहवालातील शिफारशी

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कारणमिमांसा देऊन निर्णय देण्याबाबत सूचना निर्गमित करणे.

२) छायांकित प्रती व प्रमाणित प्रती देण्यासंदर्भात स्पष्टीकरणात्मक परिपत्रक काढणे.

३) प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.

४) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्याकडील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची माहिती असणारी पुस्तिका प्रसिध्द करण्याबाबत सूचना देणे.

५) अभिलेख्यांची सूची करण्याबाबत निदेश देणे.

६) सार्वजनिक प्राधिकरणांकडील योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च, अर्थसंकल्पीय तरतूदी, प्रत्यक्ष खर्च याचा अहवाल कलम ४ अन्वये जनतेस सहजतेने उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन आदेश देणे.

७) राज्य सरकार तर्फे निधीव्दारे ज्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणावर वित्त पुरवठा केला जातो अशा अशासकीय संस्थांची यादी प्रसिध्द करणे.

१०) कलम २७ प्रमाणे नियम प्रसिध्द करणे.

११) तक्रार निर्णयाबाबत नियम तयार करणे.

१२) आयोगाच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देणे.

### राज्य माहिती आयोगाच्या सन २००८ च्या अहवालातील शिफारशी

१) अभिलेखे सूचीबध्द करणे व संगणकीकरण करण्यायोग्य अभिलेख्यांचे संगणकीकरण करणे.

२) नियमांची मानके कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत.

३) अधिनियमाच्या कलम २ (ज) प्रमाणे कोणती माहिती मागता येते व कोणती माहिती मागता येत नाही याचे विश्लेषण प्रसिध्द करणे.

४) माहिती मिळण्याकरता प्रसिध्द केलेले अतिरिक्त नियम, मार्गदर्शक तत्त्वे प्रसिध्द करणे.

५) आयोगाच्या आदेशाचा अवमान झाल्यास शास्ती होऊ शकते याची स्पष्ट कल्पना देणारे परिपत्रक काढणे.

६) योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत शासन आदेश काढणे.

७) प्रथम अपीलावरील निर्णय देताना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावरील निर्णयात माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत विश्लेषण करण्याचे शासन स्तरावरुन आदेश देण्याबाबत.

## राज्य माहिती आयोगाच्या सन २००९ च्या अहवालातील शिफारशी

१) कलम ४ ची अंमलबजावणी गंभीरपणे करणे.

२) कलम १९ (१) अन्वये केलेल्या प्रथम अपीलावर कशा प्रकारे निर्णय घ्यावा याबाबत शासनस्तरावर परिपत्रक काढणे.

३) वन हक्क व जल स्वराज्य समितीकडील योजनांशी संबंधित माहिती देण्यासाठी ग्राम सेवकांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करणे.

४) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या तरतूदींचे पालन करण्याबाबत.

५) प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून किमान नायब तहसिलदार दर्जाचे अधिकारी नेमण्याबाबत.

६) दारिद्रय रेषेखालील अर्जदारांना जास्तीत जास्त ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याबाबत.

७) अनुदानित शाळांतील मुख्याध्यापकांना माहिती अधिकारांतर्गत माहिती देण्याचे निदेश देण्याबाबत.

## राज्य माहिती आयोगाच्या सन २०१० च्या अहवालातील शिफारशी

१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली द्वितीय अपिले निकाली काढण्यासाठी कार्यपध्दती विहित करणे.

२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (ख) प्रमाणे आणि महाराष्ट्र राज्य शासनाचे परिपत्रक क्रमांक केंमाअ २००८/८७०/प्र.क्र.३००/सहा, दिनांक १३-५-२००९ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या पत्रव्यवहारावर जन माहिती अधिकाऱ्याचा तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा पूर्ण पत्ता (नावासहित), पदनाम, दूरध्वनी क्रमांक, ई मेल आय.डी. इत्यादी बाबी नमूद करण्याबाबत पुन्हा निंदर्शनास आणणे.

३) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) नुसार ३० दिवसांच्या आत अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर कलम ७ (६) नुसार अर्जदाराने मागितलेली माहिती मोफत पुरविण्यासंदर्भात कागदपत्रांच्या छायाप्रतींसाठी येणारा खर्च संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेणे.

४) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) किंवा १९ (२) अन्वये प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने अपील मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत निकाली न काढल्यास कलम १९ (६) प्रमाणे विलंबाने प्रकरण निकाली काढताना झालेल्या उशिराबाबतची कारणे नमूद करणे, अन्यथा प्रशासकीय कारवाई करणे.

५) अर्जदाराने माहिती प्राप्त करण्यासाठी भरलेली रक्कम त्याच कामासाठी कशी वापरता येईल व ती वापरण्यासाठी कोणती कार्यपध्दती कार्यान्वित करता येईल, याचा शासन स्तरावर विचार करणे.

६) माहितीच्या अधिकारात अर्जदाराने साक्षांकित अनेक प्रतींची मागणी केल्यास माहिती शुल्काचे दर नव्याने निश्चित करावेत जेणेकरून साक्षांकित प्रतींच्या मोबदल्यात शासनास महसूल उपलब्ध होऊ शकेल.

७) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत शासनाचे निर्णय तसेच परिपत्रके ग्राम पातळीपर्यंत पोहोचतील याची खात्री करणे.

**<u>विद्यमान अहवालात आयोगाच्या खालील शिफारशी आहेत :-</u>**

१) कलम ४ ची अंमलबजावणी गांभीर्याने करणे :-

कलम ४ ची अंमलबजावणी अजूनही गांभीर्याने केल्याचे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणी हा या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या व सार्वजनिक कारभारातील स्वयंस्फूर्त पारदर्शकतेच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा भाग आहे. दिनांक १२ ऑक्टोबर २००५ रोजी हा कायदा अस्तित्वात आला, तेव्हा कलम ४ च्या अंमलबजावणीसाठी १२० दिवसांची मुदत देण्यात आली होती. त्याच्या कितीतरी पटीने मुदत उलटून गेली तरी अद्याप बहुसंख्य सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये या कलमाची पूर्णांशाने अंमलबजावणी झालेली नाही. तसेच ज्या प्राधिकरणांनी कलम ४ ची अमंलबजावणी केली आहे त्यांनी दरवर्षी ही माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. कलम ४ च्या १७ बाबींची माहिती दरवर्षी अद्ययावत करण्यात आली पाहिजे.

२) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार अभिलेख सूचिबध्द करणे व संगणकीकरण करणे :-

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ पूर्णपणे महाराष्ट्र अभिलेख अधिनियमाची २००५ शी निगडीत आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. माहिती अर्जान्वये मागविलेली माहिती बहुतांशाने अभिलेखाशी

संबंधित असते व अभिलेख अद्ययावत असतील तर माहिती देण्यात अडचणी उद्‌भवत नाहीत. अभिलेख सूचिबध्द करणे, संगणकीकरण करण्यायोग्य अभिलेखांचे संगणकीकरण करणे इत्यादीमुळे माहिती अधिकार अधिनियम अधिक सुकर होईल. त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार अभिलेख सूचिबध्द करणे व अभिलेखांचे संगणकीकरण करणे आवश्यक झाले आहे.

३) आयोगाच्या आदेशांचे अनुपालन विहीत मुदतीत करणे :-

राज्य माहिती आयोगाने कोणत्याही अपिलांवर किंवा कोणत्याही तक्रारींवर निर्णय देते वेळी राज्य जन माहिती अधिकाऱ्यांने वाजवी कारणांशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला आहे, किंवा कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत माहिती सादर केलेली नाही किंवा माहिती मिळविण्यासाठी केलेली विंनती दुष्ट हेंतूने नकारली आहे, किंवा जाणुनबुजून चुकीची किंवा दिशाभुल करणारी माहिती दिलेली आहे, किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे, किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे, असे आयोगाचे मत झाले तर आयोग कलम २०(१) नुसार शास्ती लादली जाते किंवा विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येते. या शास्तीची अमंलबजावणी करण्याची जबाबदारी पूर्णपणे विभाग प्रमुखांची आहे. शासनाने याबाबत लक्ष घालून आवश्यक आदेश निर्गमित करावे.

ज्या प्रकरणांमध्ये आयोगाने माहिती देण्याची शिफारस केली असते त्या त्या प्रकरणांमध्ये अशी माहिती देऊन त्याचा अहवाल आयोगाला पाठविणे आवश्यक आहे. मात्र असे अहवाल प्रथम अपिलीय अधिकारी किंवा जन माहिती अधिकारी आयोगाकडे पाठवीत नाहीत. राज्य माहिती आयोगाच्या आदेशांचे अनुपालन विहीत मुदतीत करण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयीन प्रमुखांनी पुढाकार घेणे आवश्यक ठरत आहे.

४) दारिद्र्य रेषेखालील अर्जदारांना किती पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य पुरवावी याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता :-

दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती अनेक मुद्यांवर व व्यापक स्वरुपात माहिती मागतात, असे निदर्शनास आले आहे. अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडे अशी माहिती पुरविण्यासाठी पुरेसे अनुदान उपलब्ध नसते. यास्तव दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना मोफत पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या नियंत्रित करणे आवश्यक झाले आहे.

५) योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत शासन आदेश काढणे :-

द्वितीय अपिलांची सुनावणी घेतांना असे निदर्शनास आले आहे की, सहकार विभाग, महसूल विभाग तसेच अन्य काही विभागांमध्ये कनिष्ठ लिपिकाची नेमणूक जन माहिती अधिकारी म्हणुन तर वरिष्ठ लिपिकाची नेमणूक प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून करण्यात आली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी हा कार्यालय प्रमुख व त्यांच्या निम्न स्तरावरील अधिकारी हा जन माहिती अधिकारी असणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करावेत अशी शिफारस करण्यात येते.

६) प्रथम अपिलावर विहीत मुदतीत निर्णय घेणे :-

अनेक प्रकरणांमध्ये असे निदर्शनास येते की, प्रथम अपिलावर निर्णय दिलेला नसतो किंवा प्रथम अपिलावर निर्णय देण्यास बराच विलंब झालेला असतो. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अपिलावर निर्णय देताना विलंबाची कारणे नमूद करावीत तसेच माहितीच्या अर्जातील सर्व मुद्दे विचारात घेऊन मुद्देनिहाय सुनावणी द्यावी. तसेच प्रथम अपिलामध्ये सुनावणीच्यावेळी अपिलार्थीस या आधी जी माहिती दिली नाही व देणे आवश्यक आहे, अशी माहिती समक्ष देणे आवश्यक आहे.

द्वितीय अपिलांची संख्या वाढण्यास बऱ्याच प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत, असे निदर्शनास येते. एक तर प्रथम अपिलीय अधिकारी वेळेच्या आत अपील निकाली काढत नाहीत, अपील निकाली काढले तरी माहिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी गंभीरतेने घेत नाहीत. जन माहिती अधिकाऱ्यास माहिती देण्याबाबत पुन्हा वेळ देऊन प्रथम अपील निकाली काढतात. यामुळे राज्य माहिती आयोगाकडे मोठ्या प्रमाणावर द्वितीय अपिले सादर होतात.